

चुकलेली संघ निवड आणि

फसलेली रणनीती... पान 2

दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : १०६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.२९ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणारच, स्थगिती नाही

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, नवी दिल्ली :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याच्या आक्षेपावर आज शुक्रवारी पुन्हा सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण तीन न्यायाधीशांकडे सुनावणीसाठी पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच पुढील सुनावणी २१ जानेवारीला ठेवण्यात आली आहे.



स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांना स्थगिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. २८८ नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या निवडणुका घोषणेप्रमाणे होणार आहे. ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या निवडणुका आदेशाधीन राहणार, असं सर्वोच्च न्यायालयाने सांगितलं आहे. राज्यातील ४० नगरपरिषदा आणि १७ नगरपंचायतींमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेल्याची कबुली राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात दिली होती. त्यानंतर आज सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित सुनावणी पार पडली.

**सर्वोच्च न्यायालयाने आजच्या सुनावणीत काय काय सांगितलं?**

सर्वोच्च न्यायालयाने आजच्या सुनावणीत म्हटलं आहे की, 'मनपा, जि.प आणि पं.समित्यांच्या निवडणुकांना विलंब नको व्हायला. आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्था. स्व.संस्थांच्या निवडणुका आमच्या आदेशाधीन आहेत. त्यामुळे पुढील सुनावणी २१ जानेवारीला असेल आणि त्यावेळी तीन न्यायमूर्तींचं खंडपीठ असेल', असंही न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. तसेच, 'राज्यातील २४७ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायती अशा २८८ स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये होत असलेल्या निवडणुका घोषित झाल्याप्रमाणे होऊ द्या. कोणत्याही निवडणुकांना आम्ही स्थगिती देत नाहीयत. बांठिया आयोगाचा अहवाल आम्हीही वाचला नाही, पण सध्या त्यालाच आधार मानतायत. ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या सर्व ठिकाणच्या निवडणुका आमच्या आदेशाधीन राहणार. मनपा, जि.परिषदा, पं.समित्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण नको', असंही सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.

**निवडणुकीचे प्रचार कधी थांबतील?**

निवडणूक आयोगाच्या ४ नोव्हेंबर २०२५च्या एकत्रित आदेशातील आचारसंहितेबाबत तरतूद सुधारित करण्यात आली आहे. त्यानुसार आता मतदान सुरु होण्याच्या दिवशीच्या आदल्या दिवशी रात्री १० वाचता प्रचाराची सांगता होणार आहे. म्हणजे, २ डिसेंबर २०२५ला मतदान पार पडत असल्यानं आदल्या दिवशी म्हणजे, १ डिसेंबर २०२५ला रात्री १० वाजता प्रचारकार्यक्रम थांबणार आहेत.

## नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक कामगारांसाठी भरपगारी सुट्टी जाहीर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, बुलढाणा :** जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा म्हणून राज्य सरकारने त्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे.

सरकारी कामगार अधिकारी मा. तु. जाधव यांनी कळविल्यानुसार मतदान क्षेत्रातील सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने, हॉटेल्समध्ये काम करणाऱ्या कामगारांना भरपगारी सुट्टी देणे बंधनकारक आहे.

ण अपवादात्मक परिस्थितीत पूर्ण दिवसाची सुट्टी देणे शक्य नसल्यास, कामगारांना किमान २ ते ३ तासांची सवलत देणे आवश्यक आहे.

ण सुट्टी न दिल्यास संबंधित आस्थापना धारकाविरुद्ध कारवाई करण्यात येईल. जिल्ह्यातील सर्व कामगारांनी निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावा, असे आवाहन जिल्हा कामगार विभागातर्फे करण्यात आले आहे.

## वाळू माफियांवर 'सर्जिकल स्ट्राइक'! अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांचे परवाने जागेवरच होणार रद्द



**दि.२८, नागपूर :** गौण खनिजांची अवैध वाहतूक करताना सापडलेल्या वाहनांचे परवाने (परमिट) आता जागेवरच निलंबित किंवा रद्द केले जाणार आहेत. राज्यातील वाळू व इतर गौण खनिजांचे अवैध उत्खनन आणि वाहतूक रोखण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार हा कठोर निर्णय घेण्यात आला आहे. महसूल विभागाने यासंदर्भातील परिपत्रक बुधवारी जारी केले. राज्यात मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या वाळू आणि इतर गौण खनिजांच्या चोरीमुळे शासनाच्या महसुलाची आणि पर्यावरणाची मोठी हानी होते. शिवाय, या अवैध व्यवसायातून गुन्हेगारीसुद्धा वाढली आहे. कारवाईसाठी जाणाऱ्या शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या जिवाला धोका निर्माण झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आता महसूल विभागाकडून ही कठोर कारवाई केली जाणार आहे.

शासनाचा महसूल चूकविणे हा गंभीर गुन्हा असून, काही लोक जाणीवपूर्वक असा प्रयत्न करतात. त्यांना बचक बसावा यासाठी हा निर्णय घेतला आहे, असे बावनकुळे यांनी सांगितले.

**तीन टप्प्यांत शिक्षा...**

- पहिला गुन्हा असेल तर ३० दिवसांसाठी परवाना निलंबित करणे आणि वाहन अडकवून ठेवणे.
- दुसरा गुन्हा असेल तर ६० दिवसांसाठी परवाना निलंबित करणे आणि वाहन अडकवून ठेवणे.
- तिसरा गुन्हा असेल तर संबंधित वाहनाचा परवाना कायमस्वरूपी रद्द करणे आणि प्रादेशिक परिवहन प्राधिकरण मार्फत पुढील कारवाईसाठी वाहन जप्त करणे.

**या वाहनांवर करडी नजर...**

अवैध उत्खनन आणि वाहतुकीसाठी वापरले जाणारे ड्रील मशीन, जेसीबी व पोकलैंड, ट्रॅक्टर, ट्रॅक्टर ट्रॉली, हाफ बॉडी ट्रक, फुल बॉडी ट्रक, डंपर, ट्रॉलर, कॉम्प्रेसर, ट्रॉलर, बार्ज, मोटोराईज्ड बोट, एक्सकॅव्हेटर, मॅकेनाईज्ड लोडर यासारख्या सर्व प्रकारच्या वाहनांवर व साहित्यावरही कारवाई लागू असणार आहे

## गर्भवती महिला आणि बालआरोग्यासाठी भारत सरकारची मोफत ऑडिओ कॉल सेवा : किलकारी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** मातृतव व बालआरोग्य सशक्त करण्याच्या दिशेने केंद्र सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय अंतर्गत किलकारी ही मोबाईल – आधीरित मोफत स्वास्थ्य सेवा देशभर प्रभावीपणे कार्यरत आहे. या सेवेमधून गरोदर महिला व एक वर्षाखालील बाळ असलेल्या कुटुंबांना त्यांच्या मोबाईलवर स्थानिक भाषेत (मराठीसहित) आठवड्यातून १ वेळा आरोग्यविषयक मार्गदर्शन ऑडिओ कॉलद्वारे दिले जाते.

**कोण लाभ घेऊ शकतो?**

किमान ४ महिन्यांची नोंदणी झालेली गर्भवती महिला तसेच १ वर्षाखालील बाळ असलेली कुटुंबे.

कॉल कोणत्या क्रमांकावरुन येईल ?

या सेवेचे सर्व अधिकृत कॉल १६००४०३६६० या फोन क्रमांकावरुन येतात. नागरिकांनी हा क्रमांक आजच आपल्या मोबाईलमध्ये जतन करुन ठेवावा, जेणेकरुन कॉल सहज ओळखता येईल आणि महत्वाचा संदेश ऐकणे चुकू नये. येणारा कॉल हा ३ ते ५ मिनिटांचा असून पूर्ण कॉल ऐकणे आवश्यक आहे.

**गरोदर महिलेला कॉल कधीपासून येतात?**

गर्भधारणेच्या १३ आठवड्यापासून (किंवा अंदाजे ४ थ्या महिन्यापासून) गरोदर महिलेला किलकारीचा फोन आठवड्यातून १ वेळा येण्यास प्रारंभ होतो. तसेच बाळ १ वर्षाचे होईपर्यंत हे कॉल नियमितपणे प्राप्त होत राहतात.




**कॉल चुकला तर काय ?**

एखादा कॉल नागरिकाकडून चुकल्यास, किंवा पुन्हा ऐकायचा असल्यास, नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावरुन १४४२३ हा नंबर डायल करुन त्याच आठवड्याचा किलकारी संदेश अगदी मोफत पुन्हा ऐकता येतो.

**किलकारी संदेशात काय असते ?**

गरोदर महिलेच्या गर्भावस्थेच्या महिन्यानुसार आवश्यक आरोग्य सूचना उदा. जर एखादी महिला ५ व्या महिन्यात असेल, तर तिला ५ व्या महिन्यात अपेक्षित मार्गदर्शन दिले जाते. त्याचप्रमाणे, बाळाच्या वयानुसार दर आठवड्याला बाळाच्या आरोग्य व देखभालीबाबत मार्गदर्शन दिले जाते. संदेशामध्ये आहार, औषधोपचार, नियमित तपासणी, लसीकरण, आजार प्रतिबंध, आरोग्यसवयी, आणि काळजी घेण्याच्या आवश्यक टिप्सचा समावेश असतो.

**सेवेचा मुख्य उद्देश !**

किलकारी सेवेमुळे गरोदर महिला, नवमाता, बाळ आणि त्यांचे कुटुंब आरोग्यदृष्ट्या जागरुक होऊन निरोगी व आनंदी जीवन जगण्यास सक्षम बनतात. ही सेवा संपूर्णपणे मोफत असून, नागरिकांनी तिचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

**सेवा सुरु करण्यासाठी नोंदणी कशी करावी**

आपल्या भागातील आशा सेविका, ए.एन.एम. आरोग्य कर्मचारी किंवा जवळील शासकीय आरोग्य केंद्रात जा. गर्भधारणा किंवा बाळाच्या जन्माची अधिकृत नोंदणी करुन घ्या. नोंदणी करताना तोच मोबाईल क्रमांक द्या ज्यावर तुम्हाला किलकारीचे कॉल प्राप्त कपायचे आहेत. ही माहिती ऑनलाईन आर. सी. एच. प्रणाली मध्ये नोंदविली जाईल आणि त्यानंतर कॉल्स आपोआप सुरु होतील.

**अधिक माहितीसाठी...**

नागरिकांनी जवळील शासकीय आरोग्य केंद्र किंवा आशा व ए.एन.एम. आरोग्य कर्मचारी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

# मुंबई-ठाण्यात ९ मेट्रो प्रकल्पांना गती!

## राज्य सरकारकडून ५०० कोटींचे बिनव्याजी कर्ज

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, ठाणे :** ठाणे ते मुंबई दरम्यानच्या मेट्रो प्रकल्पांना गती देण्यासाठी राज्य सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. एमएमआरडीएला मुंबई–ठाणे परिसरातील ९ मेट्रो प्रकल्पांसाठी तब्बल ५०० कोटी रुपयांचे बिनव्याजी कर्ज वितरित करण्यात आले आहे. या निधीमुळे संबंधित प्रकल्पांना चालना मिळून कामे अधिक वेगाने पूर्ण होण्याची शक्यता आहे. अर्बन डेव्हलपमेंट डिपार्टमेंटने हे कर्ज दहिसर, मीरा रोड, ठाणे, कल्याण इत्यादी मार्गांवरील प्रकल्पांसाठी मंजूर केले असून, हे कर्ज ५० टक्के केंद्र सरकारच्या करांसाठी आणि १०० टक्के स्थानिक कर व जमिनीच्या किमतींसाठी देण्यात आले आहे.

एमएमआरडीएला मिळालेल्या या कर्जातून विविध प्रकल्पांसाठी निधी वर्ग करण्यात आला आहे. मुंबई मेट्रो लाईन ५, जी ठाणे–मुंबई–भिवंडी या मार्गावर धावणार आहे, तिच्यासाठी ५२ कोटी ३८ लाख ६० हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या मार्गिकेमुळे ठाणे शहर व जिल्ह्यातील नागरिकांना मोठी सोय होणार असून वाहतूक कोंडीपासूनही सुटका मिळण्याची अपेक्षा आहे. याशिवाय या मार्गाने ठाणेकरांना मुंबईतील इतर मेट्रो मार्गांशी उत्तम जोडणी मिळणार आहे.

**कोणत्या मार्गांसाठी कर्ज मंजूर?**

इतर प्रकल्पांसाठीही महत्त्वाचा निधी अदा करण्यात आला आहे. मुंबई मेट्रो लाईन ६ (स्वामी समर्थ नगर–जोगेश्वरी–विखरोळी) साठी ३२ कोटी ९५ लाख २० हजार रुपये वितरित करण्यात आले आहेत. मुंबई मेट्रो लाईन २अ, जी दहिसर पूर्व ते डीएन नगर जोडते, तिच्यासाठी २८ कोटी ८९ लाख ७० हजार रुपयांचे कर्ज मंजूर केले आहे. मुंबई मेट्रो लाईन २इ (DN नगर–मांडले) प्रकल्पासाठी ११२ कोटी ८० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. मुंबई मेट्रो लाईन ४ आणि ४अ, म्हणजे वडाळा–घाटकोपर–मुलुंड–कासारवडवली आणि कासारवडवली–गायमुख मार्गांसाठी ९८ कोटी ७२ लाख ८० हजार रुपयांचा निधी देण्यात आला आहे. त्याचबरोबर मुंबई मेट्रो लाईन ७ (अंधेरी पूर्व–दहिसर पूर्व) साठी ४९ कोटी ६३ लाख २० हजार रुपये मंजूर झाले आहेत.



मुंबई मेट्रो लाईन ९ (दहिसर–मीरा रोड) आणि मार्ग ७अ (अंधेरी–छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ) प्रकल्पांसाठी एकत्रित ६६ कोटी ७१ लाख ४० हजार रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. त्याशिवाय गायमुख–शिवाजी चौक, मीरा रोड प्रकल्पासाठी ८६ कोटी १४ लाख ८० हजार रुपये मंजूर झाले आहेत, तर मुंबई मेट्रो लाईन १२ (कल्याण–तळोजा) साठी १ कोटी ८ लाख ९० हजार रुपयांचा निधी देण्यात आला आहे. या सर्व निधी वितरणाबाबतचा जीआर राज्य सरकारने बुधवारी जारी केला असून, यामुळे मुंबई आणि ठाणे परिसरातील सर्व मेट्रो प्रकल्पांना वेग येण्याची अपेक्षा आहे.




## दिल्ली अभी दूर नाही

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिल्ली–मुंबई द्रुतगती मार्गाच्या कामासंदर्भात नुकतीच महत्त्वाची माहिती दिली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम शक्य तितक्या लवकर पूर्ण करून तो प्रवाशांसाठी सुरू करण्याच्या दिशेने वेगाने पावले उचलली जात आहेत.

सुरतमध्ये झालेल्या पाहणीदरम्यान गडकरी यांनी गुजरातमधून जाणाऱ्या एक्सप्रेसवेच्या भागाची प्रगती तपासली. त्यावेळी बोलताना त्यांनी सांगितले, सर्व अडथळे दूर करून आम्ही हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहोत. रस्ता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्तम पद्धतीने बांधला जात आहे. उरलेल्या किरकोळ कम तरताही आम्ही दूर करत आहोत, असे त्यांनी पत्रकारांना सांगितले. प्रकल्पाबद्दल माहिती

हा द्रुतगती मार्ग ८ पदरी असून, मुंबई–दिल्ली प्रवासाचा वेळ सध्याच्या २४ तासांवरून थेट १२ तासांपर्यंत कमी करणार आहे. या मार्गाची सध्या दक्षतेने तपासणी करण्यात येत असून, प्रवाशांना अधिक सुरक्षित, सुखकर आणि अखंडित प्रवासाचा अनुभव कसा देता येईल, यावर लक्ष केंद्रित केले जात आहे. प्रकल्पाचा एकूण खर्च नियंत्रणात ठेवण्यासाठी जगातील सर्वात आधुनिक तंत्रज्ञान वापरले जात आहे. एकदा पूर्ण झाल्यानंतर पर्यटनाला मोठी चालना मिळेल, तसेच नागरिकांसाठी हा प्रवास अधिक सुकर होईल, असेही गडकरी यांनी सांगितले. यासोबत एक्सप्रेसवेच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणावर झाडे लावली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी प्रकल्पाशी संबंधित आणखी एक महत्त्वाची माहिती दिली. काम पूर्ण होताच हा मार्ग उत्तर प्रदेश आणि राजस्थानशी जोडला जाणार असून, या दोन्ही राज्यांना दिल्ली आणि मुंबई या दोन्ही प्रमुख शहरांशी थेट जोडणी मिळणार आहे. भविष्यात या मार्गावर इलेक्ट्रिक बस आणि ट्रक धावताना पाहण्याचे स्वप्न असल्याचेही गडकरी यांनी व्यक्त केले.

या भागाचे काम अंतिम टप्प्यात

या प्रकल्पातील वडोदरा–मुंबईला जोडणाऱ्या ३७९ किमीच्या महत्त्वाच्या भागाचे काम सध्या अंतिम टप्प्यात असून, पुढील वर्षाअखेर ते पूर्ण होणार आहे. १३५९ किमी लांबीच्या या द्रुतगती मार्गामधील वडोदरा–मुंबई जोडणी, जी विरारमार्गे पूर्ण मार्गाशी जोडते, हा संपूर्ण प्रकल्पातील सर्वात निर्णायक टप्प्यांपैकी एक आहे. देशातील सर्वात लांब एक्सप्रेसवे प्रकल्पांपैकी एक असलेल्या दिल्ली–मुंबई एक्सप्रेसवेची पायाभरणी २०१९ मध्ये करण्यात आली होती. पूर्ण झाल्यावर हा ८–लेन महामार्ग भारताची राष्ट्रीय राजधानी आणि आर्थिक राजधानी यांमधील प्रवास वेळ जवळपास निम्म्यावर आणत, फक्त १२ तासांपर्यंत मर्यादित करणार आहे.

## पैसा..

निवडणूक काळात
भिरभिर फिरे पैसा
अडवू नका भ्रमंती
मोका ना मिले ऐसा

त्याला न आडकाठी
लागत नाही व्हिसा
भरून टाकतो गच्च
गरीबां तुझा खिसा

इतर वेळी झोपडीत
फिरकत ना सहसा
आता ठाण वस्त्यांत
कमाल तुझे साहसा

प्रसन्न होई सत्तादेवी
पावली आता नवसा
उन्हाळ्यात बरसला
थंडगार केले पावसा

तुझीचं लेक बाटली
शेकते झकास घसा
आमंत्रंण देते रोजचं
चला मैफिलीत बसा

कधी भेटायला येतो
सामिष भोजन वेषा
भुलावण देण्या स्तव
विचीत्र धारण पेशा

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# सफर कर्नाळ्याची- पक्षी अभयारण्य




## भाग : ०१

कर्नाळा हा किल्ला महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यात आहे. त्याचप्रमाणे तो कर्नाळा पक्षी अभयारण्याचाही एक भाग आहे कारण ज्यावेळेस आपण किल्ला बघण्यासाठी जातो तेव्हा, सर्वप्रथम पक्षी अभयारण्य तेथे स्थित आहे. असे हे कर्नाळा पक्षी अभयारण्य मुंबई गोवा महामार्गांवर आहे. पनवेल हायवे वरून जातांना डाव्या बाजूला भव्य प्रवेशद्वार आहे. काही अंतर पायी चालत गेल्यावर आतील बाजूने किल्ल्याच्या चढाईला सुरुवात होते. या किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व असे की, हा किल्ला यादवकालीन असून तेराव्या शतकात बांधला आहे असे मानले जाते.

महाराष्ट्र ही छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. त्यामुळे लहानपणापासून शिवरायांचे शौर्य पराक्रम मनात ठासून–ठासून भरले आहे. प्रत्येकाच्या मनात किल्ला, ऐतिहासिक वास्तु विषयी विशेष आकर्षण असते.. किल्ला म्हटला की मनाला शौर्य, पराक्रम, समर्पण त्यागाची आठवण होते.त्यामुळे किल्ला, ऐतिहासिक वास्तू, संग्रहालय पाहण्यास मन धजावते.त्या विषयी सखोल अभ्यास करावासा वाटतो, म्हणून जशी वेळ भेटेल तसे वाचन अथवा प्रत्यक्ष ऐतिहासिक वास्तू बघण्याचा योग आल्यास, बघावयास जाण्यास तीव्र इच्छा होते. योगायोगाने रेल डाक सेवेत कर्मचारी असल्यामुळे एक ड्युटीचा भाग म्हणून सेक्शनच्या ड्युटी निमित्ताने पुणे, मुंबई सारख्या ठिकाणी जाण्याचा योग येतो. तेथील प्रचंड गर्दी, गाड्यांचे कर्णकर्कश आवाज त्यामुळे दिवसभर नकोसे वाटते. म्हणून मनाला ताजेतवाने ठेवण्यासाठी फावल्या वेळेत कुठेतरी फिरायला अथवा ऐतिहासिक वास्तूंना भेट देण्यासाठी जायचे ठरवले. कार्यालयातील सहकारी मित्र विकास परांजपे यांनीही होकार दर्शवला. गुगलबाबा व जी–चॅट नावाच्या ॲपवर आजूबाजूच्या स्थळांची चौकशी केली असता मुंबईपासून जवळच्या किल्ल्यापैकी यादीतील कर्नाळा किल्ला व पक्षी अभयारण्य बघावयास जाण्याचे ठरवले. रात्रीची ड्युटी करून डोळ्यात झोप होती. मात्र सकाळी लवकर उठलो. तयारी केली. ट्रेकिंगचा फारसा अनुभव नाही परंतु तोडक्या ज्ञानानुसार एका बॅग त्यामध्ये पाण्याची बॉटल व इतर आवश्यक वस्तू घेतल्या. सकाळी नऊ वाजता लोकलने पनवेल जाण्यासाठी निघालो. रेस्ट–हाऊस पासून जवळ असलेल्या मस्जिद स्टेशनला गेलो. मस्जिद ते पनवेल असे लोकलचे रिटर्न तिकीट काढले. साधारण चाळीस रुपये येणे–जाणे असे हे अगदी नगण्य तिकीटदर आहे. जवळपास पन्नास ते पंचावन्न मिनिटांमध्ये पनवेल येथे पोहोचलो. पनवेल स्टेशनच्या ईस्ट अर्थात पूर्व दिशेला उतरलो. तेथील फारशी माहिती नसल्यामुळे प्रवाश्यांना विचारत स्टेशनच्या बाहेर पडलो. अगदीजवळच सिटी बसचे स्थानक आहे. तेथे चौकशी केली असता, पायी चालत आणि विचारपूस करत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बस स्थानकापर्यंत पोहोचलो. बस स्थानकाच्या बाजूला एक छोट्याशा टपरीवर भूक लागल्यास खाण्यासाठी बिस्किट, चॉकलेट वगैरे घेतले.किल्ले फिरण्याचा आवडीतून पुढे–पुढे चालत राहिलो.पनवेल बस स्थानकावरून पेन आगाराच्या बसमध्ये पनवेल ते कर्नाळा अभयारण्य हे तिकीट काढले.बसचे भाडे प्रत्येकी एकवीस रुपये होते. बसमधील महिला कंडक्टरने सुद्धा योग्य मार्गदर्शन व सहकार्य करून अगदी कर्नाळा अभयारण्याच्या मुख्य प्रवेशद्वारा जवळ उतरवून दिले. कर्नाळा हे मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या नं ६६ वर पनवेलहून पेनला जाताना डाव्या बाजूला आहे.

निसर्गरम्य अशा परिसरातील भव्य प्रवेशद्वारातून कर्नाळा पक्षी अभयारण्यात आत शिरलो. साधारण पन्नास ते साठ पावलं चालत गेल्यावर तेथे वन्यजीव विभागाच्या मार्फत सूचनाफलक लावले आहे. वन्य प्राण्यांना त्रास देऊ नये.धोका होऊ शकतो वगैरे. त्याचबरोबर पक्षी अभयारण्य तथा किल्ला बघण्यासंदर्भात शुल्क भारतीय पर्यटक साठ रुपये तर पाच ते बारा वयोगटातील मुले तीस तर विदेशी पर्यटक ऐकशे वीस व मुले साठ असे शुल्क आकरण्यात आले आहे. त्याचबरोबर कॅमेरा शुल्क,पार्किंग शुल्क संदर्भात फलक लावलेले आहे. ते व्यवस्थित वाचून बुकिंग काउंटरवर गेलो. उपवन संरक्षण वन्यजीव विभाग ठाणे मार्फत वनसंरक्षक तपासणी नाका यांनी रोख रक्कम भरण्याची पावती दिली. पावतीवर आधारकार्ड व भ्रमणध्वनी क्रमांक नोंद करून संध्याकाळी पाच वाजेपर्यंत किल्ल्यावरून परत येण्याविषयी तोंडी सूचना दिल्या. संबंधित पावती सोबत घेतली.सोबत बाळगलेल्या वस्तूंची चौकशी करण्यासाठी एका पत्राच्या शेडखाली एक महिला कर्मचारी रजिस्टर घेऊन बसल्या होत्या.तेथे कर्नाळा पक्षी अभयारण्यातील नियम असे फलक लावले आहे. व पर्यटकांसाठी सूचना लिहल्या आहेत.प्लास्टिक डिपॉझिट रक्कम सायंकाळी सहा वाजेपर्यंत दिले जातील. अर्थात अभयारण्य प्रवेश करण्याअगोदर तपासणीसाठी एक रजिस्टर होते. तेथे पर्यटकाचे नाव, भ्रमणध्वनी क्रमांक,आपण आपल्या बॅगमध्ये कोणत्या वस्तू सोबत घेऊन जात आहे. याचा तपशील उदाहरणार्थ सोबत प्लॅस्टिकची बॉटल, चॉकलेट, बिस्कीटचा पुडा वगैरे त्याचा संपूर्ण तपशील तेथे महिला कर्मचारी नोंद करून घेत होत्या. त्याचीच डिपॉझिट रक्कम शंभर रुपये होती. मी ऐकून आश्चर्यचकित झालो व आनंदही झाला.कारण ज्या वस्तू आपण सोबत घेऊन जाणार त्या वापरल्यानंतर त्यांचा प्लास्टिक कचरा होतो. तो कचरा पक्षी अभयारण्य व किल्ल्यांच्या परिसरात टाकल्या जातो. तो तेथे टाकता कामा नये. किल्ल्यावरून परत येतेवेळेस नोंद केलेल्या वस्तूंपैकी जर एखाद्या वस्तूंचे, वापरलेल्या प्लास्टिक कागदाचा तुकडा तपशील नोंदीप्रमाणे कमी पडला तर डिपॉजिट रक्कम परत मिळणार नाही. अशी स्पष्ट ताकीद होती. हा उपक्रम बघून खूप छान वाटले.अश्या या पर्यटकांसाठीच्या ओम गं गणपतये नमो नमः सूचना प्रथमच अनुभवास मिळाल्या. माझ्या मते, ह्या सूचना प्रत्येक किल्ला, राष्ट्रीय उद्यान, प्रेक्षणीय स्थळ, प्रार्थना स्थळावर असायला हव्यात.कारण व्यक्ती आपल्या सोबत बाळगलेल्या खाद्य पदार्थाच्या वस्तू खाऊन त्याचे रॅपर तेथेच फेकून मोकळे होतात. त्यामुळे पवित्र स्थानाचे पवित्र्य अबाधित राहत नाही. कचऱ्याचा डिग साचून भू–प्रदूषण होते. त्यासाठी हा अतिशय सुंदर असा उपक्रम आहे.

कर्नाळा पक्षी अभयारण्याच्या भव्य प्रवेशद्वारावरील हिरव्यागार बोर्डखालून हिरव्यागार जाळीच्या लोखंडी गेटमधून आत शिरलो. रस्त्याच्या दुतर्फा छान फलक लावले होते. त्यापैकी सावधान...! वन्य प्राण्यांना त्रास देऊ नका. त्याचप्रमाणे कर्नाळा पक्षी अभयारण्याविषयी थोडक्यात माहितीसंबंध फलक लावले आहे. थोडक्यात माहिती अशी कि, कर्नाळा अभयारण्याचे क्षेत्रफळ १२.१५४ चौरस किलोमीटर असून, मुंबई गोवा महामार्गावर वसले आहे. डॉ.सलीम अली यांच्या प्रेरणेतून या पक्ष अभयारण्याची निर्मिती झाली असून, येथे पक्षांच्या अनेक प्रजाती आढळतात. शाहीन ससानाची जोडी घरटे बांधते. त्याचबरोबर ऐतिहासिक कर्नाळा किल्ला हा निसर्गप्रेमी व भटकंती करणाऱ्यांसाठी आकर्षण आहे. या फलकाबरोबर, कृपया हे लक्षात ठेवा. व या गोष्टी करू नका. अशा सूचनांचे फलकसुद्धा तेथे लावलेले आहे. हे वाचत–वाचत रस्त्याने चालत होतो. रस्त्याच्या दुतर्फा वेगवेगळ्या प्रकारची झाडे आहेत. घनदाट जंगल आहे. या अभयारण्यामध्ये काही पक्षी निरीक्षण करण्याचे स्थळे आहे. तेथे पक्षी आहेत. जसे की, बॅवलर, पबार्वेट, बुलबुल, कावळा, ड्रॅगो, ओरिओल हे अँप्रोच रोड टू रेस्ट हाऊसच्या स्थानावर आहे. बदक, गरुड, फ्लायकेचर, कोरा, खड्या पक्षी हे गोल प्लॅटफॉर्मवर आहे. तर कोकम नाल्याजवळ सूर्यपक्षी, थ्रश व सुतार पक्षी यांची नोंद आहे.मोर टाका ट्रेलमध्ये वरीलपैकी काही तर हरियाली ट्रेल मध्यभाग मध्ये हार्नबिल, परकीट, गुलाबी मानेचा बुलबुल,कावळा,ड्रॅगो,फफाऊल,गरुड पक्षी तर पुढे बर्डवाचर्स पॉईंट या स्थानकावर वरील पक्षांची नोंद आहे. तर सातव्या स्थानावर अर्थात कर्नाळा किल्ल्यावर गरुड व शाहीन, फाल्कन हे पक्षी आढळून येतात. मात्र ऋतुमानानुसार यातील काही पक्षी स्थलांतरित होतात. त्यामध्ये विशेषत: पक्षांच्या ३७ जाती ह्या स्थलांतरित होतांना दिसून येतात. अशी नोंद आहे. साधारणपणे वरील या सर्व जाती कर्नाळा पक्षी अभयारण्यामध्ये आढळून येतात. मात्र त्यांना बघण्यासाठी अभयारण्यातील जंगलाच्या आतील काही पाऊलवाटांनी आत प्रवेश करावा लागतो.आम्हीसुद्धा तेथील आजूबाजूच्या पाऊलवाटेने गेलो. काही पक्षी आढळून आले. निसर्गवाटेने घनदाट जंगल दिसून आले.

कर्नाळा अभयारण्यातील काही दर्शनीय स्थळे आहेत. त्यामध्ये विशेषतः अभयारण्य व्ह्यू पॉइंट, नागेश पॉईंट, माथेरान पॉईंट पक्षी निरीक्षण पॉईंट अशी स्थळे आहेत. या सर्व निसर्गवाटा आहेत. डांबरी रस्त्याने चालत असताना कडेलाच काही सुंदर फलक लावलेले आहेत जसे की, आमची ही निसर्ग संपदा उद्याची कृत्रिम उत्पादने होऊ नयेत म्हणून काय करायला हवे. त्याचबरोबर साधारण सहा ते आठ फुटाचा भव्य असा कर्नाळा अभयारण्याचा नकाशा पोपटी रंगाच्या फलकावर पिवळ्या रंगाचे स्थानिक व बाजूला कर्नाळा किल्ल्याच्या टॉप पॉइंटचे चित्र आहे. एका बाजूला झाडाच्या फांदीवर एक चिमणी तर फलकाच्या उजव्या बाजूला हरणाचे चित्र आहे. नकाशाप्रमाणे अभयारण्याचे दोन भाग दिसून येतात. अर्थात अभयारण्य हे पनवेलहून पेनकडे जाणाऱ्या रस्त्यावर डाव्या बाजूला एक भाग आहे. त्यापैकी डाव्या बाजूला सरड्या टोक, नागेश पॉईंट, सरड्या माळ, घेवराडी व मोर टाका हे स्थानक आहेत. तर उजव्या बाजूला अर्थात पुलाच्या उजवीकडील बाजूने कारवी टोक, मोहरमाळ, हेदु दांड, कणी डोंगर अशी ठिकाणी आहेत. नेमकं आम्ही ज्या दिवशी अर्थात ६ नोव्हेंबर २०२५ ला गेलो असता पक्षी सप्ताह होता. अर्थात पाच नोव्हेंबर ते बारा नोव्हेंबर पर्यंत पक्षी सप्ताह चालू होता. त्या संदर्भात जागोजागी पोस्टर्स लावलेले होते. काहीशा अंतरावरच वाटेने उजव्या बाजूला एकवीरा देवी महिला बचत गटाची खानावळ आहे. अभयारण्यातील काही अंतर पाऊलवाटेने चालत जाऊन रस्त्याच्या कडेला वनातील झाडांविषयी माहिती अर्थात झाडांचे खोड, त्यांचे सुंदर चित्र काढून प्रत्येक भागाला नावे दिलेले आहेत. असे फलक आहे तर, वनस्पतींचे पाने या विषयी माहिती, प्रकाशसंश्लेषण प्रक्रिया, याविषयी माहिती दिसून येत होती. डांबरी रस्त्याच्या दोन्ही बाजूने काही निसर्गवाटा आहेत व डांबरी रस्त्यावर निसर्गाबद्दल माहितीफलक दिसून येते. पाना–फुलांचे महत्त्व कशा प्रकारचे आहे. त्याविषयी माहिती दिसून येते. त्यातील हिरवी फुफ्फुसेया फलकावर अतिशय छान लिहिलेले आहे. जंगले ही कार्बनडाय ऑक्साइडचे रूपांतर प्राणवायूत करून वातावरणाचा समतोल राखण्याचे महत्त्वाचे कार्य करतात. खरोखरच या फलकाप्रमाणे तेथील निसर्गरम्य वातावरण आहे. चहूबाजूंनी वेगवेगळ्या प्रकारची झाडे आहेत. त्यापैकी विशेषतः कोशिंब, किंजल, कळंब, जांभूळ, आवळा, उंबर, ऐन, बेल, मोह, चिंच तसेच विविध प्रकारच्या औषधी वनस्पती आहेत. त्याचबरोबर झुडपांमध्ये दिंडा, वावडिंग, कारवी आणि वेलीपैकी गुळवेल, पळसवेल हेही दिसून येतात. काही मोठ्यावृक्षांमध्ये चिंच, आंबा, जांभूळ, आपटा, आवळा हे दिसून येतात. काही औषधी वनस्पती पैकी कोकम, बेहडा, रिठा, आवळा आहेत. पर्यावरण तज्ज्ञांच्या अभ्यासानुसार व नोंदीनुसार जवळपास ६४२ वृक्ष प्रजाती या परिसरामध्ये दिसून येतात. पायी चालत गेल्यावर सखल भाग आहे. तेथे उजव्या बाजूला प्राणी, पक्षांसाठी लोखंडी जाळ्यांचे पिंजरे आहेत.त्यामध्ये मोर, चिमणी, कावळा, पोपट लांडोर हे पक्षी आढळून आले. विटा दगड माती व सिमेंटच्या चबुतऱ्यावर जाळीचे पिंजरे बनवलेले आहेत. पर्यटकांना बसण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वन्यजीव विभाग ठाणेमार्फत लाकडी बाक बसवलेले आहेत. वन्य अधिकाऱ्यांसाठी रेस्ट रूम आहे. पिण्याच्या पाण्याची टाकी, स्त्री–पुरुषांसाठी शौचालय आहे. माकडे, मांजर तसेच कुत्रे, कावळे चिमण्या हे ही तेथे भटकतांना दिसून येतात. भर दिवसा उष्णतेच्या वेळीसुद्धा वातावरण अगदी थंड व शांत वातावरण दिसून येते. पर्यटकांसाठी रिफ्रेशमेंटसाठी व भोजनासाठी महिला बचत गटामार्फत कॅन्टीनची सोय आहे. तेथे बसूनआम्ही अगदी अल्प दरात वडापाव व चहाचा आस्वाद घेतला. कॅन्टीनमध्ये सर्व महिला कर्मचारी कार्यरत होत्या. कारण कॅन्टीन ही कल्ले गावातील महिला बचत गटाने शासन नियम लक्षात घेता पर्यटकांसाठी अगदी स्वस्त दरात चालू केली आहे.

अशा या कर्नाळा पक्षी अभयारण्याला भेट देण्यासाठी सुट्टीच्या दिवशी संपूर्ण महाराष्ट्रातून शैक्षणिक सहली भेटी देतात. त्याचप्रमाणे ट्रेकर, निसर्गप्रेमी व पक्षीमित्र भेटी देतात. कारण तेथील नैसर्गिक वातावरण, पक्षी, प्राणी हे मन वेधून घेतात. सुट्टीचा योग बघून नक्कीच कर्नाळा येथील पक्षी अभयारण्याला भेट द्या.

**क्रमशः...**

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ ता.जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

# चुकलेली संघ निवड आणि फसलेली रणनीती...

गुवाहाटी येथे झालेल्या दुसऱ्या कसोटीत भारतीय क्रिकेट संघाला ४०० पेक्षा अधिक धावांनी नमवून दक्षिण आफ्रिकेने भारताला २ – ० असे नमवून व्हाइट वॉश दिला. क्रिकेट रसिकांसाठी हा पराभव धक्कादायक होता कारण पहिल्या कसोटीतही दक्षिण आफ्रिकेने भारताचा असाच लाजिरवाणा पराभव केला होता. या लाजिरवाण्या पराभवानंतर क्रिकेट प्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे आणि ते साहजिकही आहे कारण भारतीय भूमीवर झालेला हा भारताचा पहिलाच पराभव नाही. मागील वर्षी न्यूझीलंड संघानेही भारताचा असाच लाजिरवाणा पराभव करत मालिका ३ – ० ने जिंकत भारताला असाच व्हाइट वॉश दिला होता. वर्षभरात दोनदा परदेशी संघाने भारताला भारतात येऊन हरवले ते ही अतिशय लाजिरवाण्या पद्धतीने त्यामुळे क्रिकेट प्रेमींमध्ये नाराजीची भावना पसरली आहे. पूर्वी भारतात येऊन भारताला हरवणे हे परदेशी संघासाठी मोठे दिव्य होते. भारतीय भूमीवर भारत अपराजितच होता. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका अशा कोणत्याच संघाला भारतात येऊन मालिका विजय मिळविणे शक्य नव्हते. मालिकेतील एखादा दुसरा सामना ते जिंकायचे पण मालिका मात्र भारतच जिंकायचा. भारताला भारतात येऊन व्हाइट वॉश देणे ही तर अशक्यप्राय गोष्ट होती पण आता मात्र परदेशी संघासाठी ते सहज शक्य झाली आहे. असे काय कारण आहे की भारतीय संघ आपल्याच भूमीवर जिंकू शकत नाही असा प्रश्न क्रिकेट वर्तुळात विचारला जात आहे याचे सरळ आणि साधे उत्तर आहे ते म्हणजे चुकलेली संघ निवड आणि फसलेली रणनीती.... या कसोटी मालिकेसाठी जो भारतीय संघ निवडला होता तोच मुळी कसोटी क्रिकेटच्या योग्यतेचा नव्हता. या कसोटी मालिकेसाठी जो संघ निवडला त्यातील किती खेळाडू हे कसोटी खेळण्याच्या लायक होते ? हा संशोधनाचा विषय आहे. या संघात जे फलंदाज निवडले त्यांच्याकडे कसोटी क्रिकेटसाठी लागणारे तंत्र आहे का तर याचे उत्तर नाही असेच देता येईल. कसोटी मालिकेसाठी निवडलेला संघ कसोटी दर्जाचा नव्हता. या संघात निवड झालेले खेळाडू हे आयपीएल गाजवलेले धुरंदर होते. टी २० आणि कसोटी क्रिकेट यात जमीन अस्मानचा फरक आहे. कसोटीसाठी लागणारे तंत्र आणि संयम या खेळाडूंकडे नाही. फिरकी गोलंदाजी खेळण्यासाठी जे तंत्र लागते ते एकाही फलंदाजाकडे दिसले नाही. निवड समितीने जी चूक केली तीच किंबहुना त्याहून मोठी चूक संघ व्यवस्थापनाने केली. या मालिकेत संघ व्यवस्थापनाची रणनीती पूर्णपणे फसलेली दिसली. संघ व्यवस्थापनाने रचलेली एकही चाल यशस्वी ठरली नाही. भारतीय संघ व्यवस्थापन संघाची घडी बसवताना गोंधळलेला दिसला. पहिल्या कसोटीत चक्क चार फिरकी गोलंदाज खेळवण्यात आले. चार फिरकी गोलंदाज खेळवण्याची संघ व्यवस्थापनाची रणनीती पूर्णपणे फसली. चार फिरकी गोलंदाज खेळवल्यामुळे एक फलंदाज कमी पडला. त्यात शुभमन गिल जायबंदी झाल्यावर आपल्याकडे फलंदाजच उरला नाही कारण यशस्वी जयस्वाल, ऋषभ पंत हे कसोटीतही टी २० चा खेळ खेळतात. ध्रुव जुरेल हा नवखा फलंदाज असल्याने त्याच्याकडून जास्त अपेक्षा नव्हत्या. उरला एकटा के एल राहुल पण तो ही फॉर्मात नाही मग धावा करणार कोण ? जी गत पहिल्या कसोटीत झाली तीच गत दुसऱ्या कसोटीतही झाली. दुसऱ्या कसोटीत एक फिरकी गोलंदाज कमी करून नितीश कुमार रेड्डी याला खेळवण्यात आले पण त्याने दुसऱ्या कसोटीत ना गोलंदाजीत विकेट घेतल्या ना फलंदाजीत धावा काढल्या. विशेष म्हणजे दुसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या डावात त्याला फक्त एकच षटक गोलंदाजी दिली. त्याला जर गोलंदाजीच द्यायची नव्हती तर मग त्याला खेळवलेलेच का ? त्याच्या ऐवजी एक स्पेशालिस्ट फलंदाज खेळवला असता तर किमान भारताच्या काही धावा वाढल्या तरी असत्या. पहिल्या कसोटीत तिसऱ्या क्रमांकावर खेळलेल्या वॉशिंग्टन सुंदर दुसऱ्या कसोटीत थेट आठव्या क्रमांकावर आला. दुसऱ्या कसोटीत तिसऱ्या क्रमांकावर आलेला साई सुदर्शन फक्त हजेरी लावून गेला. ध्रुव जुरेलनेही तेच केले. या दोघांनी इंग्लंड दौऱ्यावर देखील काहीच केले नव्हते तरीही त्यांची निवड करण्यात आली. जर योग्य खेळाडूंची निवड झाली असती आणि रणनीती फसली नसती तर असा लाजिरवाणा पराभव झाला नसता. म्हणजेच चुकलेली संघ निवड आणि फसलेली रणनीती यामुळेच हा लाजिरवाणा पराभव भारतीय संघाला स्वीकारावा लागला. या पराभवातून धडा घेऊन बीसीसीआयने निवड समिती आणि संघ व्यवस्थापनाला बरखास्त करायला हवे. बीसीसीआयने नवीन निवड समिती आणि नवा प्रशिक्षक लवकरात लवकर निवडायला हवा. प्रशिक्षकपदी गंभीर आल्यापासून भारतीय संघाची पिछेहाटच होत आहे विशेष म्हणजे सतत पराभव होऊनही गंभीर आपली रणनीती बदलायला तयार नाही तर निवड समिती अध्यक्ष अजित आगरकर हे चुकीची संघ करत आहे. या दोघांचीही गच्छंती करण्याची वेळ आली आहे जर या दोघांना आणखी अभय दिले तर या पराभवाची पुनरावृत्तीच पहायला मिळू शकते.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## चंपाषष्ठी निमित्ताने पिंपळगाव रोठा येथे भाविकांची गर्दी
## कोरठण गडावर भंडारा खोबऱ्याची मुक्त उधळण



**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील पिंपळगाव रोठा येथे कोरठणचा खंडोबा देवाचा चंपाषष्ठी उत्सव गडावर मोठ्या उत्साहात साजरा झाला. यावेळी भाविकांनी येळकोट येळकोट जय मल्हार चा जयघोषात भंडारा खोबऱ्याची मुक्त उधळण केली.

उत्सवनिमित्त पहाटे चार वाजता खंडोबारायाचे मंगलस्नान पार पडल्यानंतर चांदीची सिंहासन पेटी व चांदीच्या उत्सव मूर्तीचे सिंहासनावर अनावरण झाले. उत्सव मूर्तींना साज-शृंगार करून पुजा व महाआरती करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पवार गटाचे नेते दिपक लंके व जया लंके, पोलीस उपायुक्त गणेश इंगळे, शांताराम भालेराव, इंदुमती भालेराव आणि अन्नदाते यांच्या हस्ते अभिषेक, पुजा व आरती करण्यात आली. गोरेगाव येथून आलेल्या पायी दिंडी सोहळ्याचे स्वागतही करण्यात आले.

दुपारी अकरा वाजता शब्दसाधक अविनाश भारती व घाटनांदुरफर यांचे किर्तन पार पडले, तर दुपारी एक वाजता शाहीर विलास अटक व शाहीर नामदेव शिंदे यांनी खंडोबाची गाण्यांची स्पर्धा सादर केली. याचवेळी खंडोबारायाची शाही रथातून मंदीर प्रदिक्षणा मिरवणूक पार पडली. सकाळी अकरा वाजल्यापासून भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी कोरठण खंडोबा देवस्थानच्या अध्यक्षा शालिनी घुले, उपाध्यक्ष महेश शिरोळे, माजी सरपंच अशोक घुले, खजिनदार कमलेश घुले, विश्वस्त चंद्रभान ठुबे, तुकाराम जगताप, भाऊसाहेब गाडगे, जालिंदर खोसे, सुवर्णा घाडगे, अजित महांडुळे, सुरेश फापाळे, दिलीप घुले व महादेव पुंडे उपस्थित होते.

## मल्टी कमोडिटी एक्सचेंज एम.सी.एक्स. मार्फत
## बचत गटातील महिलांना निवेशक जागरूकता कार्यक्रम



**अक्षराज : शिवाजी औसेकर**
**दि.२८, धारूर :** तांदळवाडी तालुका धारूर येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच एम. सी. एक्स. च्या माध्यमातून बचत गटातील महिलांना एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन सौ अनिता पवार मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच एम.सी.एक्स. चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर गणेश चौधरी यांनी उपस्थित महिलांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.

यात त्यांनी महिलांना बचत, आर्थिक नियोजन व त्याचे महत्त्व, डिमॅट अकाउंट, फायनान्शियल मार्केट्स, कमोडिटीचे प्रकार, जागतिक स्तरावर सक्रिय असलेल्या कमोडिटिज (सोने, चांदी) यांची मागणी व येणाऱ्या काळात त्यात होणाऱ्या भाव वाढीचे बदल, वेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट रेग्युलेशन ॲक्ट, कमोडिटी व इक्विटी मध्ये असलेला फरक, तसेच सेबीच्या सारथी ॲप चे महत्व इत्यादीचे मार्गदर्शन केले. तसेच गुंतवणूक करत असताना महिलांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मोहर भिसे यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन केले. तर सूत्रसंचालन निर्मला साखरे मॅडम यांनी केले. तसेच या कार्यक्रमास महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## 'महा-देवा फुटबॉल उपक्रम' अंतर्गत निवडक ६० विद्यार्थ्यांना
## विशेष प्रशिक्षणासाठी सामंजस्य करार - क्रीडा मंत्री ॲड.कोकाटे



**अक्षराज : जे.के.पोळ**
**दि.२७, मुंबई :** राज्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागातील फुटबॉलमधील प्रतिभेला व्यासपीठ देण्यासाठी महादेवा फुटबॉल उपक्रम अंतर्गत निवड झालेल्या ६० मुला-मुलींना विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा व युवक कल्याण विभाग, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा), वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (डब्ल्यूआयएफए) आणि व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाऊंडेशन (व्हीएसटीएफ) यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला असल्याची माहिती क्रीडा मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिली. या उपक्रमांतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना तज्ञ प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा, फिटनेस मॉड्यूल तसेच राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील मोठ्या स्पर्धांमध्ये सहभागी होण्याच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. राज्यातील प्रत्येक खेळाडूला योग्य संधी, सक्षम मार्गदर्शन आणि दर्जेदार सुविधा देण्यात येणार असल्याचे क्रीडामंत्री कोकाटे यांनी सांगितले.

## बापाने सहा वर्षांच्या लेकीला दारू पाजली आणि...

**दि.२८, नाशिक :** नाशिकमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. बाप-लेकीच्या नात्यावर काळिमा फासणाऱ्या या प्रकारामुळे नाशिकमध्ये खळबळ उडाली आहे. एका सावत्र बापाने त्याच्या ६ वर्षांच्या चिमुरडीचा लैंगिक छळ केल्याचा प्रकार समोर आला आहे. त्याने तिचा छळ केल्याचा आरोप मुलीच्या आईने केला आहे.

नाशिकच्या भगूर येथे हा प्रकार उघडकीस आला आहे. बुधवारी (२६ नोव्हेंबर) ला नाशिकच्या भगूर मध्ये सुकापूर पेठेत ही घटना घडली आहे. राहुल रावत (मूळ रा.गाव - सरिया तोल,जिल्हा सतना,राज्य मध्य प्रदेश) हा त्याची पत्नी आणि तिच्या ६ वर्षांच्या मुलीसोबत येथे राहत होता. संशियित राहुल हा मोलमजुरीची कामे करून उदरनिर्वाह करतो. बुधवारी घरात मुलीच्या अज्ञात पणाचा फायदा घेऊन त्याने तिला दारू पाजली. त्यानंतर तिच्या शरिराला अयोग्य पद्धतिने स्पर्श करून तिचा लैंगिक छळ केला. मुलीच्या आईने हा प्रकार बघताच तिने लगेच पतीला जाब विचारला आणि मुलीला घेऊन देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात धाव घेतली. तिथे जाऊन तिने संशयित राहुल विरोधात तक्रार नोंदवली. नोंदवलेल्या तक्रारी नुसार राहुल बब्बु रावत याच्यावर देवळाली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला गेला आहे.

# सामाजिक न्यायाच्या वाटचालीत फुले विचार अनमोल - बाळासाहेब खिलारी

## टाकळीढोकेश्वर येथे महात्मा फुले यांना स्मृतीदिनानिमित्त अभिवादन

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.२८, पारनेर (अहिल्यानगर) :** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १३५ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना टाकळी ढोकेश्वर (ता. पारनेर) येथिल महात्मा फुले चौकात आदरांजली अर्पण करण्यात आली. श्री संत सावतामाळी प्रतिष्ठान व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी तसेचटाकळी ढोकेश्वर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महात्मा फुले यांनी शिक्षणाची क्रांती घडवून समाजाला नवी दिशा दिली. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना शिक्षण देत मुलींच्या शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवली. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्याची परंपरा सुरू करून छत्रपतींच्या कार्याचा वारसा समाजासमोर आणला. टाकळी ढोकेश्वर येथिल महात्मा फुले चौक परिसरात महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा संयुक्त पूर्णाकृती पुतळा उभारण्याचे व सुशोभीकरण उभारण्याचे काम करणार असल्याची माहिती बाळासाहेब बाळासाहेब खिलारी यांनी दिली.

यापसंगी खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा सरपंच बाळासाहेब खिलारी,सामाजिक कार्यकर्ते मोहनराव रोकडे, जेष्ठ पत्रकार बबनराव गायके,प्रकाश इघे सर, समता परिषदेचे उपाध्यक्ष पत्रकार वसंत रांधवण, वैभव होमकर, आदित्य रांधवण,ओम रांधवण,सागर रांधवण,बाबू गुंजाळ, विकास सोनुळे, निलेश गायकवाड, गाडेकर आर्दीसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> मुलींना शालेय शिक्षणाची गंगा खुली करून महात्मा ज्योतिबा फुले हे आधुनिक भगीरथ बनले. मुलींची पहिली शाळा ते शेतकऱ्यांचा आसूड हा ग्रंथ लिहून त्यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या. छत्रपती शिवरायांची समाधी शोधली. त्यामुळे सामाजिक सुधारणांसह त्याला कृतीची जोड देणारा महात्मा म्हणून ज्योतिबा फुले यांच नाव आदराने घेतले जाते. क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार आजच्या युवा पिढीसाठी प्रेरणादायी असून त्यांच्या विचारांनी समाजातील परिवर्तनाची वाट मोकळी केली.
> 
> **- प्रकाश इघे सर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक**




# मुंबईच्या झगमगाटात रंगला आट्यापाट्यांचा खेळ

**अक्षराज : प्रभाकर हजारे**
**दि.२८, मुंबई :** गगनचुंबी इमारती, प्रखर लाईटचा झगमगाट, बॉलिवूडची चंदेरी दुनिया असणाऱ्या मुंबई शहरात चक्क ग्रामीण मातीतला आट्यापाट्याचा खेळ रंगतो आणि शहरी मुलं या मातीतल्या खेळाचा मनसोक्त आनंद घेतात ही आजच्या धावपळीच्या जीवनातील नक्कीच आश्चर्यांची बाब आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, मुंबई शहर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील विविध जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न होत आहेत. यामध्ये कुस्ती, कबड्डी, खोखो, क्रिकेट, फुटबॉल, हॉलीबॉल, कराटे, तायकांदो अशा अनेक खेळांचा समावेश आहे. या खेळांबरोबर महाराष्ट्राच्या मातीमध्ये अगदी प्राचीन काळापासून खेळला जाणाऱ्या आट्यापाट्या या खेळाच्या जिल्हास्तरीय स्पर्धा वडाळा मुंबई येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर



कॉलेज मैदानावर आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये १४,१७ व १९ वर्षाखालील मुला मुलींच्या स्पर्धा आयोजित करण्यातघेण्यात आल्या. या स्पर्धेत तिन्ही वयोगटाच्या मिळून जवळपास २५ संघाच्या ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या शाळांतील विद्यार्थ्यांनी विशेषतः या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. या स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात पार तर पडल्याच पण तितकीच चुरस सुद्धा पाहायला मिळाली.

२६ व २७ नोव्हेंबर या दोन दिवसांच्या स्पर्धेचे नीटनेटके आयोजन व नियोजन मुंबई शहर जिल्हा क्रीडा अधिकारी मार्क धरमाई यांच्या मार्गदर्शनाखाली आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेजच्या सहकार्याने उत्तम प्रकारे करण्यात आले होते.

या स्पर्धांचे उद्घाटन डॉ.आंबेडकर कॉलेजच्या प्राचार्या डॉ.यशोधरा वराळे आणि लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ.देविदास गवई यांच्या शुभहस्ते पार पडले. यावेळी कॉलेज जिमखान्याचे चेरमन प्रा.डॉ. नितीन खरतड हे ही उपस्थित होते.

या स्पर्धेत वाडीबंदर मुंबई पब्लिक स्कूलच्या दोन संघांनी व सिताराम मिल मुंबई पब्लिक स्कूलच्या एका संघाने मुलांच्या गटातून प्रथम क्रमांक मिळवत विभागीय स्पर्धेसाठी पात्रता फेरी गाठली आहे. तर मुलींच्या गटातून या दोन्ही शाळेच्या संघानेच प्रथम क्रमांक मिळवत विभागीय फेरी गाठली आहे.

या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे क्रीडा अधिकारी अनिल घुगे व क्रीडा मार्गदर्शक फुलचंद कराड, तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका शारीरिक शिक्षण विभागाचे वरिष्ठ पर्यवेक्षक दत्तू लवटे, कनिष्ठ पर्यवेक्षक सुभाष डोफे, रवि पाटील, चंद्रकांत घोडेराव, अनिल मोरे यांनी मेहनत घेतली.

# प्रसारमाध्यम प्रतिनिधींसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या सूचना

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.२८, रत्नागिरी :** मतदान व मतमोजणी केंद्रावरील प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनी दक्षता घेण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात सूचना दिल्या आहेत. कुठल्याही मतदान केंद्रावर किंवा मतमोजणी केंद्रावर प्रवेशिकेशिवाय प्रवेश करता येणार नाही. प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनी थेट मतदान केंद्रावरील मतदान कक्षाजवळ जाऊन पहाणी किंवा छायाचित्रे, छायाचित्रण करता येणार नाही. मतदार मतदान करतानाचे छायाचित्र किंवा छायाचित्रण पुरेशा अंतरावरून करणे बंधनकारक असेल. ते करतानाही मतदानाच्या गोपनीयतेच्या हक्काचे उल्लंघन होता कामा नये. प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना दिलेली प्रवेशिका रद्द करण्याचे अधिकार यथास्थिती संबंधित जिल्हाधिकारी अथवा निवडणूक निर्णय अधिकारी अथवा राज्य निवडणूक अधिकाऱ्यांस असतील.

मतदान व मतमोजणी केंद्रावरील संबंधित अधिकारी/ कर्मचारी प्रवेशिकेची उचित पडताळणी करुनच प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना मतदान/ मतमोजणी केंद्रावर प्रवेश देतील. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना थेट मतदान केंद्रावरील मतदान कक्षाजवळ जाऊन पाहणी किंवा छायाचित्रण करता येणार नाही; तसेच मतदान कक्षाचे छायाचित्रेही घेता येणार नाही. शांततापूर्ण व शिस्तबद्ध मतदान प्रक्रियेत बाधा पोहचेल, असे कुठलेही वर्तन करता कामा नये. मतदार मतदान करतानाचे छायाचित्र किंवा छायाचित्रण पुरेशा अंतरावरून करणे बंधनकारक असेल. ते करतानाही मतदानाच्या गोपनीयतेच्या हक्काचे उल्लंघन होता कामा नये.

कुठल्या मतदाराने कोणत्या उमेदवाराला मतदान केले आहे, हे मतदानाच्या वेळी किंवा मतमोजणीप्रसंगी अपघाताने चित्रित झाल्यास किंवा त्याचे छायाचित्र काढल्यास त्याचे प्रसारण किंवा प्रसिद्धी करता येणार नाही. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना मतदान/ मतमोजणी केंद्रावर छायाचित्रासाठी किंवा छायाचित्रणासाठी कॅमेराचे स्टँड नेता येणार नाही. राज्य निवडणूक आयोग/ संबंधित जिल्हाधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक प्रक्रियेसाठी नेमलेला अधिकृत छायाचित्रकार किंवा कॅमेरामन यांनाच मतदान केंद्रात व मतमोजणी केंद्रात कॅमेराचे स्टँड नेता येईल. मतदान किंवा मतमोजणी केंद्रावर प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींची एकाच वेळी होणारी गर्दी व गोंधळ टाळण्यासाठी आवश्यकतेनुसार गटागटाने सर्वांना आत सोडण्याबाबतचे किंवा परिस्थितीनुरुप नियोजन करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष यांना असतील.

# चंद्रपूर - नागपूर महामार्गाच्या दुरुस्ती कामाला सुरुवात...

## खा.धानोरकर यांनी घेतली होती आक्रमक भूमिका !

**अक्षराज : वसंत वडस्कर**
**दि.२७, चंद्रपूर :** चंद्रपूर-नागपूर महामार्गावरील खड्ड्यांमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांसाठी दिलासा मिळण्याचे संकेत आहेत. प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली असून, महामार्गाच्या दुरुस्तीचे काम सुरु झाले आहे. खा. प्रतिभा धानोरकर यांनी याबाबत सार्वजनिक बांधकाम मंडळ आणि महामार्ग प्राधिकरणाविरुध्द आवाज बुलंद केला होता.

खा. धानोरकर यांनी सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर येथील अधीक्षक अभियंता यांना पत्र लिहून चंद्रपूर-नागपूर महामार्गाची तत्काळ दुरुस्त करण्याची मागणी केली होती. या पत्रात त्यांनी स्पष्ट केले होते की, महामार्गावर अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडले असून, पावसाळ्यामुळे ही समस्या अधिकच गंभीर झाली होती. या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना आणि नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. तसेच यामुळे भविष्यात मोठे अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे प्रशासनाने अखेर महामार्गाच्या दुरुस्तीसाठी तातडीने पाऊले उचलली आहेत. दुरुस्तीचे काम सुरु झाल्याने वाहनचालकांना आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. धानोरकर यांच्याकडून या कामाचा सातत्याने पाठपुरावा सुरू राहणार असून, जोपर्यंत रस्त्याची गुणवत्ता सुधारत नाही आणि महामार्ग पूर्णपणे सुस्थितीत येत नाही, तोपर्यंत प्रशासनावर दबाव कायम ठेवला जाईल, अशी माहिती खा. प्रतिभा धानोरकर यांच्या वतीने देण्यात आली आहे. लवकरच हा महामार्ग अपघातमुक्त आणि सुस्थितीत दिसेल, असा विश्वास ही खा.धानोरकर यांनी व्यक्त केला आहे.



# नगरपरिषद/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम - २०२५

## भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ प्रमाणे बंदी आदेश जारी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२८, रायगड (अलिबाग) :** राज्य निवडणूक आयोगाने दि.०४ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या आदेशान्वये राज्यातील नगरपरिषद/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम-२०२५ जाहीर केला आहे. या कार्यक्रमानुसार रायगड जिल्ह्यातील नगरपरिषद/नगरपंचायत हद्दीमध्ये मंगळवार दि.०२ डिसेंबर २०२५ रोजी मतदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. या निवडणूकीच्या अनुषंगाने निवडणूक निकाल जाहिर होईपर्यंत आचारसंहिता अंमलात राहणार असून, निवडणूक खुल्या व निर्भय वातावरणात पार पाडणे तसेच मतदारांना आपल्या म तदानाचा हक्क निर्भयपणे बजावता येणे आवश्यक आहे.

याकरिता जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ नुसार जिल्ह्यातील (पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात) नगरपरिषद/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम-२०२५ च्या अनुषंगाने दि.०२ डिसेंबर २०२५ रोजी होणाऱ्या नगरपरिषद/नगरपंचायत निवडणूकीच्या मतदान समाप्तीकरीता निर्धारित केलेल्या वेळेच्या ४८ तास अगोदरच्या कालावधीमध्ये खालील कृती करण्यास मनाई जारी केला आहे.

पाच पेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र जमण्यास किंवा फिरण्यास मनाई आहे. निवडणूक प्रचार करणे, सार्वजनिक सभा, बैठका घेणे इत्यादी कृतीस मनाई आहे. (तथापी घरोघरी भेटी/ प्रचारास मनाई नाही), राजकीय प्रचार करण्याच्या उद्देशाने बल्क मेसेज करण्यास मनाई आहे. ज्या नगरपरिषद/ नगरपंचायत हद्दीमध्ये मतदान होणार आहे, तेथे मतदार नसलेले राजकीय कार्यकर्ते/ नेते यांना त्या नगरपरिषद/ नगरपंचायत हद्दीमध्ये थांबण्यास मनाई आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीस मोबाईल फोन, वायरलेस किंवा इतर संपर्क साधने घेवून जाण्यास मनाई आहे. (निवडणूकीशी संबंधीत कामाकरिता नियुक्त केलेले अधिकारी, कर्मचारी व सुरक्षेकरिता नियुक्त केलेले अधिकारी, कर्मचारी वगळून).

मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात लाउडस्पीकर, मेगाफोन वापरणे, आरडा-ओरड करणे, गोंधळ घालणे, गैरवर्तन करणे इत्यादी कृती करण्यास मनाई आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीस शस्त्र घेवून जाण्यास मनाई आहे. (अपवाद -मतदान केंद्राच्या सुरक्षेकरिता नियुक्त केलेले अधिकारी/कर्मचारी, ज्या व्यक्तीस झ्झ्र/न+ दर्जाची सुरक्षा पुरविण्यात आली आहे. अशा व्यक्तीस साध्या वेशात एक सुरक्षा रक्षक शस्त्र लपवलेल्या स्थितीत घेवून जाता येईल). मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात आस्थापना चालू ठेवण्यास मनाई आहे. मतदारांना देण्यात येणारी चिठ्ठी पांढऱ्या कागदावर असावी. त्यावर कोणत्याही उमेदवाराचे नाव, पक्षाचे चिन्ह, पक्षाचे नाव नसावे. मतदान केंद्राच्या परिसरात पक्षाचे कार्यकर्त्यांचे निवासस्थाने असल्यास त्याठिकाणी प्रचार करणे, बैठका घेणे, मतदानाकरिता जाणाऱ्या मतदारांवर प्रभाव पाडण्यासाठी कोणतेही कृत्य करण्यास मनाई आहे. मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीस वाहन आणण्यास मनाई आहे. (अपवाद अपंग/ वृद्ध/ आजारी मतदारांना घेवुन येणारी वाहने). मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसराचे आत राजकीय पक्षांचे/उमेदवारांचे निवडणूक बुथ लावण्यास मनाई आहे. मतदान केंद्राच्या २०० मीटर बाहेर निवडणूक बुथ लावताना खालील अटींचे पालन करावे. बुथ लावण्याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घ्यावी व बुथ लावणेबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांना आगावू माहिती द्यावी. प्रत्येक बुथवर कमाल एक टेबल, दोन खुर्चा असाव्यात. बुथकरीता लावलेल्या मंडपाचा आकार १० द १० फुट पेक्षा जास्त नसावा. प्रचार कालावधी संपल्यानंतर राजकीय पक्ष प्रचाराला भरीव चालना देण्यासाठी, मतदार संघाच्या बाहेरून पाठीराख्यांना आणण्यासह त्यांच्या समर्थकांची हलवाहलव करतात. ही वस्तुस्थीती लक्षात घेता, प्रचार कालावधी संपल्यानंतर, मतदारसंघात कोणताही प्रचार होऊ नये यासाठी, बाहेरुन आणलेले आहेत व जे त्याच्या/ तिच्या मतदारसंघाचे मतदार नाहीत असे राजकीय कार्यकर्ते/ पक्ष कार्यकर्ते/ मिरवणुकीतील कार्यकर्ते/ प्रचार कार्यकर्ते, इत्यादीना नियमितपणे मतदारसंघामध्ये उपस्थित राहता येणार नाही, कारण प्रचार संपल्यानंतर, त्यांच्या निरंतर उपस्थितीमुळे मुक्त व निष्पक्ष मतदानाचे वातावरण धोक्यात येऊ शकते.

हा मनाई आदेश रायगड जिल्ह्याच्या हद्दीतील (पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात) नगरपरिषद / नगरपंचायत मतदार संघाच्या हद्दीत दि.३० नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वा. पासून ते दि.०२ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७.०० वा. पर्यंत अंमलात राहील. तसेच या मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २२३ नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शेतीसाठी दिवसा थ्री फेज वीजपुरवठा व्हावा - बाळासाहेब खिलारी

## टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायतचे महावितरण अधिकाऱ्यांना निवेदन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील ३३/११ केव्ही विद्युत उपकेंद्रांतर्गत सामाविष्ट असलेल्या गावांना रात्री ऐवजी दिवसा शेती थ्री फेज वीजपुरवठा उपलब्ध करण्यात यावा. अशी मागणी खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांनी टाकळी ग्रामपंचायतीच्या वतीने अहिल्यानगर उपविभागीय महावितरण कार्यालय अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



दरम्यान, झालेल्या चर्चेत लवकरच सकारात्मक निर्णय घेतला जाईल असे आश्वासन अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार यांनी खिलारी यांना दिले.

> टाकळी ढोकेश्वर पंचक्रोशीत बिबट्यांची मोठ्या प्रमाणात दहशत असून या बिबट्याने अनेक शेतकऱ्यांच्या पाळीव प्राण्यांची शिकार केली आहे. विद्युत वितरण कंपनीने दिलेला रात्रीचा विद्युत पुरवठा शेतकऱ्यांच्या शेतीसाठी उपयोगी ठरत नसल्याने, आता विद्युत वितरण कंपनीने आत अधिक अंत न पाहता शेतकऱ्यांसाठी कांदा,गहू, पिकांना पाणी भरण्यासाठी दिवसा आठ तास पूर्ण दाबाने वीज द्यावी.
>
> **– बाळासाहेब खिलारी (अध्यक्ष खासदार निलेश लंके प्रतिष्ठान, पारनेर)**

निवेदन म्हटले आहे की, सध्या आठवड्यातील चार दिवस दिवसा तर चार दिवस रात्री थ्री फेज वीजपुरवठा उपलब्ध आहे. परिसरात गेल्या अनेक दिवसापासून बिबट्याचा वावर आहे. बिबट्याच्या धास्तीने नागरिक आता पुरते वैतागले आहेत. रात्री शेतकऱ्यांना शेती पिकांना पाणी देण्यासाठी जीव मुठीत धरावा लागतो. परिणामी रात्रीचा विद्युत पुरवठा असतानाही शेतकरी व शेतमजूर शेतात जाण्यास धाडस करत नाही. त्याम ुळे विद्युत वितरण कंपनीने रब्बी हंगाम वाचवण्यासाठी शेती पंपांना दिवसा आठ तास वीज पुरवठा द्यावा अशी मागणी टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आली आहे.

# निघोज व लोणी मावळा परिसरात दिवसा वीज; आ.दातेंच्या प्रयत्नांना यश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील विविध भागातील शेतकरी बिबट्यांच्या धास्तीमुळे गेल्या अनेक दिवसांपासून दिवसा वीजपुरवठा मिळावा. यासाठी सातत्याने मागणी करत होते. त्यास यश येत निघोज व लोणी मावळा येथील सोलार ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून ही गरज पूर्ण होणार असून या परिसरातील शेतकऱ्यांना उद्यापासून दिवसा वीज उपलब्ध करून दिली जाणार असल्याची माहिती आमदार काशिनाथ दाते दिली.



दाते म्हणाले की, शेतीच्या सिंचनासाठी विजेचे लोडशेडींगमुळे पिकांना पाणी देणे, पिण्यासाठी व इतर वापरासाठी पाणी भरण्यासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. सौरऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून ही गरज पूर्ण होणार आहे. या उपक्रमासाठी संबंधित कंपनीकडून सौर प्रकल्पाद्वारे

> “सौर ऊर्जेच्या माध्यमातून दिवसा वीजपुरवठा उपलब्ध करणे हा शेती क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण टप्पा असून, ग्रामीण भाग स्वावलंबी होण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल टाकेल, शेतकऱ्यांनी सातत्याने मांडलेल्या मागण्यांचा पाठपुरावा केल्यामुळे आणि प्रशासनाशी सतत संपर्क ठेवून प्रयत्न केल्यामुळेच हा ऐतिहासिक निर्णय शक्य झाले आहे, दिवसा मिळणाऱ्या विजेमुळे शेती कामात वेग येईल, कृषी उत्पादनात वाढ होईल आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होईल.
>
> **– आ.काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)”**

विजेची निर्मिती करून तो वीजपुरवठा शेतकऱ्यांना उपलब्ध करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. निघोज येथील ७ मेगावॅट क्षमतेच्या सोलार प्रकल्पाचे काम आवादा नामक कंपनीने पूर्ण केले असून संबंधित प्रकल्पाची टेस्टिंग होऊन उद्यापासून लगेचच निघोज, जवळा, गुणोरे आणि वडनेर या ४ फिडर वर शेतीपंपासाठी सप्लाय देता येणार आहे, तर लोणी मावळा उपकेंद्रात ५ मेगावॅट क्षमतेचा सोलार प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला असून उद्यापासून शेतकऱ्यांना रोज सकाळी ९ ते संध्याकाळी ५ या वेळेत दिवसा वीजपुरवठा देण्यात येणार आहे.

# चंद्रपूर येथे धनोजे कुणबी समाज जगन्नाथबाबा नगरची उपशाखा कार्यकारिणी गठीत

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** धनोजे कुणबी समाज लक्ष्मीनगर, वडगाव, चंद्रपूर अंतर्गत धनोजे कुणबी समाजाची गाव/ वॉर्ड तिथे उपशाखा उपक्रमा अंतर्गत दिनांक २७ नोव्हेंबर २०२५ रोजी जगन्नाथ बाबा मठ येथे जगन्नाथबाबा नगर (सिस्टर कॉलनी, ठक्कर कॉलनी, रेव्हेन्यू कॉलनी) वॉर्डातील जेष्ठ समाज बांधव, समाजातील प्रतिष्ठित नागरिक, आजी माजी लोकप्रतिनिधी, कर्मचारी आणि धनोजे कुणबी समाज लक्ष्मीनगर कार्यकारणीचे उपाध्यक्ष संजय ढवस, सदस्य रविंद्र झाडे, सदस्य अॅड. देवा पाचभाई, माजी सहसचिव भाविक



येरगुडे, माजी सदस्य विलास माथनकर यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली.

धनोजे कुणबी समाजाचे एकत्रिकरण करून समाजाला सामाजिक, शैक्षणिक, व्यावसायिक तसेच आर्थिक सर्वच क्षेत्रात सक्षम कसे करता येईल यावर सर्वांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर धनोजे कुणबी जगन्नाथ बाबा नगर कार्यकारणी पुढील प्रमाणे गठीत करण्यात आली.

अध्यक्ष कवडूजी ढवस, उपाध्यक्ष अॅड.संदीप नागपुरे, सुरेश विधाते, रविंद्र मत्ते, तर सचिव प्रा.प्रमोद उरकुडे, सहसचिव दशरथ ताजने आणि सदस्यपदी संतोष देरकर, अभिजित पोटे, देवराव बोढे, सुनील उरकुडे, देवराव पिंपळशेंडे, बंडू उपरे, अजय उपरे, संजय लेडांगे, किशोर मत्ते, अतुल बरडे यांची निवड करण्यात आली. यानंतर चंद्रपूर शहर व तालुक्यामध्ये प्रत्येक गावात धनोजे कुणबी समाजाची उपशाखा स्थापन करून समाजाला एकत्रित करण्याकरिता मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जातील. त्याकरिता सर्वच प्रकारचे सहकार्य करण्याचे आश्वासन धनोजे कुणबी समाज लक्ष्मीनगरचे उपाध्यक्ष संजय ढवस यांनी प्रास्ताविक भाषणामधून मधून व्यक्त केले.

# थोडक्यात

## गोवंश जनावरांची अवैध वाहतूक; दोन आरोपींना अटक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** गोवंश जनावरांची अवैध वाहतूक करणाऱ्या दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपीचे नाव शेख शाहरुख शेख मेहबुब (३१), सोहेल अहमद शेख हुसेन (२९) दोन्ही रा.मौलाना आझाद वार्ड, बल्लारपूर आहे. विरुर पोलीस हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय माहितीवरुन महाराष्ट्र-तेलंगणा राज्य सिमेवरील मौजा अंतरगाव वन तपासणी नाका येथे दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी नाकाबंदी करुन एक महिंद्रा बोलेरो पिकअप वाहन थांबवून त्यातील एकूण ७ गौवंशीय जनावरांची सुटका केली. सदरच्या ७ गौवंशीय जनावरे वाहतूक करणारे आरोपी शेख शाहरुख शेख मेहबुब (३१), सोहेल अहमद शेख हुसेन(२९), दोन्ही रा. मौलाना आझाद वार्ड बल्लारपूर यांना ताब्यात घेवून कारवाई दरम्यान गौवंशीय जनावरे ७ नग किंमत अंदाजे १,७५,००० रु. आणि गुन्ह्यात वापरलेला वाहन किंमत अंदाजे ७,५०,००० रु. असा एकूण ९,२५,००० रुपयांचा माल जप्त करण्यात आला असून आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन विरुर येथे गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास विरुर पोलीस करीत आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर नंदनवार यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक संतोष वाकडे, अफसर पठाण, विभीषण खटके, भुषण इटनकर, राहुल वैद्य, अविनाश बोरुले सर्व पोलीस स्टेशन विरुर यांनी केली आहे.

## डोळखांब विभागातील महिलांसाठी मोफत शिवणकला प्रशिक्षण सुरू

**अक्षराज : अक्षय गिरा**



**दि.२८, शहापूर (ठाणे) :** भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा उत्तर मंडळाच्या वतीने, अध्यक्ष अभिजीत सुरेश भोईर यांच्या पुढाकाराने डोळखांब विभागातील महिलांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देण्यासाठी स्वधा संस्था, कल्याण यांच्या माध्यमातून मोफत शिवण क्लासेसला सुरूवात करण्यात आली.

या उपक्रमाची खास बाब म्हणजे प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या महिलांना रोजगारासाठी मोफत शिलाई मशीन देण्यात येणार आहे. त्यामुळे परिसरातील महिलांना स्वावलंबनाचा नवा मार्ग खुला होत आहे. उद्घाटन प्रसंगी शहापूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती नंदूशेठ डोहळे, भाजपा उत्तर मंडळ उपाध्यक्ष शिवाजी भेरे, स्वधा संस्थेच्या महिला पदाधिकारी तसेच फिल्ड वर्कर्स शिवाजी भोईर व मनोज भोईर उपस्थित होते. महिलांना मार्गदर्शन करताना सभापती नंदूशेठ डोहळे म्हणाले की, तालुक्यात इतर ठिकाणी कोणत्याही प्रकारची मदत लागल्यास आम्ही सदैव तयार आहोत. महिलांनी व्यवसाय सुरू करण्याची इच्छा दर्शवल्यास आवश्यक ती जागा उपलब्ध करून दिली जाईल. या उपक्रमासाठी मोफत जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल सभापतींनी अभिजीत भोईर यांचे विशेष आभार मानले. उपक्रमामुळे महिलांना आर्थिक स्वावलंबनाकडे वाटचाल करण्याचा एक मजबूत आधार मिळणार आहे.

## राज्यव्यापी 'शिव पाणंद' शेतरस्ता जनजागृती अभियानाचा मंत्रालयातून शुभारंभ



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२८, सुपा (अहिल्यानगर) :** तमाम महाराष्ट्रातील शेवटच्या शेतकरी भावापर्यंत दर्जेदार शेतरस्ता पोहोचवण्यासाठी आणि शेतरस्त्यांशी संबंधित कायमस्वरूपी अडचणी दूर करण्यासाठी 'शिव पाणंद शेतरस्ता चळवळ' निर्णायक टप्प्यात पोहोचली आहे. शेत तिथे रस्ता - गाव तिथे समृद्धी हा नारा प्रत्यक्षात उतरवण्यासाठी चळवळीने एकात्मता आणि सामूहिक नेतृत्वाचा व्यापक दृष्टिकोन स्वीकारला आहे. गुरुवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकाऱ्यांनी आझाद मैदान, मुंबई येथे समन्वय बैठक घेतली. पुढील आंदोलनाची दिशा, जनजागृती आणि संवाद यावर महत्त्वपूर्ण निर्णय ठरवण्यात आले.राज्यभर प्रशासन, शासन आणि न्यायालयीन पातळीवर सातत्यपूर्ण संघर्ष करून, अनेक तालुके-जिल्ह्यांत संघटन बळकट केली आणि सरकारचे लक्ष वेधले. या प्रयत्नांना प्रतिसाद देत राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक ऐतिहासिक निर्णय जाहीर केले. चळवळीच्या वतीने सरकारचा सन्मान व आभारही व्यक्त करण्यात आले. जिल्हा - तालुका प्रशासनाकडून निर्णयांची प्रभावी अंम लबजावणी व्हावी यासाठी पदाधिकारी मंत्रालयात भेटी देत, संबंधित विभागांना निवेदने सादर करून सातत्यपूर्ण पाठपुरावा करत आहेत.मंत्रालयातून शेत तिथे रस्ता - गाव तिथे समृद्धी या राज्यव्यापी जनजागृती अभियानाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. ग्राम, तालुका आणि जिल्हा पातळीवर हे अभियान भव्य व प्रभावीपणे राबवून शासन निर्णयाचा लाभ सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा पक्का निर्धार पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. यावेळी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, अॅड.सागर जोरी, अॅड.प्रणाली समीर येवले, शांताराम पानमंद, जेष्ठ पत्रकार शिवाजी राऊत, सचिन शेळके, रामहरी बोंबे, दत्तात्रय बांगर, सुरेश भुजबळ,संजय साबळे, बबन गुंड, भाऊसाहेब वाळूंज, दशरथ वाळूंज, संजय जाधव, संजना जाधव, स्वप्नील कोहकडे आदी राज्यभरातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बारड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून वृक्षारोपण

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२८, मुदखेड (नांदेड) :** स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारड संचलित श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारड अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना स्तर २ विभागांकडून भारतीय संविधान निर्मितीला ७५ वर्ष निमित्त वृक्षारोपण करण्यात आले. श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारड २६ नोव्हेंबर संविधान दिनानिमित्त संविधान उद्देश पत्रिकेचे वाचन हा कार्यक्रम उत्साहामध्ये साजरा करण्यात आला. त्याचप्रमाणे संविधानाला ७५ वर्ष पूर्ण झाल्या निमित्ताने देशभरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे या उद्देशाने दि.२८ नोव्हेंबर २०२५ रोजी कॉलेजच्या प्रांगणात नारळ वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.